पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/९८५२२८०/२०२५ दिनांक - १८/०२/२०२५

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

हिंजवडी वाहतुक विभाग हद्दीत एक गाव एक शिवजयंती उत्सव २०२५ निमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असुन मिरवणुकी करीता मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थीत राहणार असल्याने वाहतूक कोंडीची शक्यता नाकरता येत नाही. त्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर हिंजवडी गावठाण ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यानची वाहतुक पर्यायी रस्त्याने वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी बापू बांगर , पोलीस उपायूक्त, वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### <u>हिंजवडी वाहतुक विभाग</u>

- कस्तुरी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग १ :- मारुंजी वाय जंक्शन चौकाकडुन कस्तुरीचौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणारी वाहतूक ही कस्तुरी चौक येथुन उजवीकडे वळुन विनोदे वस्ती मार्गे व डावीकडे वळुन इंडियन ऑईल चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

पर्यायी मार्ग २ :- मेझा-९ चौकाकडुन हिंजवडी गावठाणकडे जाणारी वाहतूक ही श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन सरळ पुढे जावुन इंडियन ऑईल चौक, कस्तुरी चौक, विनोदे वस्ती मार्गे इच्छित स्थळी जातील.

पर्यायी मार्ग ३ :-इंडियन ऑईल चौक व साखरे वस्तीकडुन हिंजवडी गावठाणकडे जाणारी वाहतूक ही जांभुळकर जीम चौकातच यु टर्न घेवुन परत इंडियन ऑईल चौक, कस्तुरी चौक, विनोदे वस्ती चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

- **मेझा-९ चौकाकडुन श्री शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या दोन लेन पैकी डावी लेन बंदकरून सर्व वाहतूक ही उजव्या बाजुचे लेनने सुरु राहील.**

तरी वरील नमुद मार्गावर दि.१९/०२/२०२५ रोजी शिवजयंती उत्सव २०२५ निमित्त दुपारी १५.०० ते २३.०० दरम्यान (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) आवश्यकतेनुसार अथवा वाहतुक सुरळीत होईपर्यंत वाहतुक बदल करण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

18/02/2025

( बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

Scanned with CamScanner

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी हिंजवडी वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड

/- वाहतूक बदलाचे अनुषंगाने बॅरीगेटींग करून योग्य तो बंदोबस्त लावण्यात यावा

Scanned with CamScanner